N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
**(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)**

1. **District (जिल्हा):** गोंदिया **P.S.(ठाणे):** गोरेगांव **Year (वर्ष):** 2020

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0025 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 15/02/2020 18:33 बजे

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |

3. **(a) Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** शनिवार

**Time Period (कालावधी):** पहर 3

**Date From (दिनांक पासून):** 15/02/2020
**Date To ( दिनांक पर्यंत):** 15/02/2020
**Time From (वेळेपासून):** 09:35 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 09:49 बजे

**(b) Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 15/02/2020 **Time (वेळ):** 18:33 बजे

**(c) General Diary Reference (रोजनामचा संदर्भ**

**Entry No. (नोंद क्र.):** 024 **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 15/02/2020 18:33 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** उत्तर, 1 किमी

**Beat No. (बिट क्र.):**

**(b) Address (पत्ता):** गोरेगाव ते गोंदिया , एकता कॉँलोनी वार्ड नं10 , गोरेगाव,गोरेगाव, 441801

**(c) In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

**(a) Name (नाव):** श्री काशीनाथ जगन भेंडारकर

**(b) Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

**(c) Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1979 **(d) Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

**(e) UID No. (यु.आय.डी. क्र.):**

**(f) Passport No.(पारपत्र क्र.):** **Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

**(g) Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**
**ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

पोलीस स्टेशन, गोरेगांव
जि. गोंदिया



**(h) Address (पत्ता):**

| S.No.(अ. क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | तेढा,गोरेगांव,गोरेगांव,गोंदिया,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | तेढा,गोरेगांव,गोरेगांव,गोंदिया,महाराष्ट्र,भारत |

**(i) Occupation (व्यवसाय):** शेतकरी

**(j) Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल नं.):** 91-8007291862

**7. Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | श्री शेखर शेसराव पुनसे | | | 1. एकता कॉलोनी वार्ड क्र10,गोरेगाव, गोरेगाव,गोरेगांव,गोंदिया,महाराष्ट्र,भारत |
| 2 | श्री.शाहिद लतीफ पठान | | | 1. 2 एकता कॉलोनी वार्ड नं10,गोरेगांव, गोरेगांव,गोंदिया,महाराष्ट्र,भारत |

**8. Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

पंचनामा कार्यवाही केल्या नंतर

**9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|

**10 Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

**11 Inquest Report / U.D. case No., if any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ. क्र.) | UIDB Number (यु.आय.डी. बी.क्र.) |
|---|---|

**12 First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

कायमी अप क्र. 25/2020 कलम 7,12लाचलुचपत प्रतिबंधक कायदा 1988 (सुधारीत अधिनियम 2018) फिर्यादी- श्री काशीनाथ जगन भेंडारकर वय 41वर्ष, व्यवसाय-शेती रा.तेढा ता.गोरेगाव जि.गोंदिया.आरोपी- श्री 1)श्री शेखर शेसराव पुनसे वय 48 वर्ष, व्यवसाय-नोकरी (तहसिलदार तहसिल कार्यालय गोरेगाव) रा.98जुना सुबेदार ले-आउट नागपुर -24,ह.मु.श्री साहिद लतिफ पठान यांचे घरी भाड्याने एकता कॉलोनी वार्ड नं.10 गोरेगाव ता गोरेगाव जि.गोंदिया2) श्री.शाहिद लतीफ पठान वय 34वर्ष व्यवसाय ट्रक चालक रा. एकता कॉलोनी वार्ड नं.10 गोरेगाव. ता गोरेगाव जि.गोंदियाघटनास्थळ- आरोपी क्र.2 यांचे राहते घर एकता कॉलोनी वार्ड क्र.10 गोरेगाव 01 कि. मी.उत्तरघटना ता, वेळ- दिनांक 15/02/2020चे 09.35 वा. ते 09.49 वा. दरम्यान प्रकरण अशा प्रकारे आहे की यातील नमुद घटना ता. वेळी व ठिकाणी यातील आरोपी क्र.01 यांनी आपल्या लोकसेवक पदाचा दुरुपयोग करुन मौजा हौसीटोला येथिल हुटकाळ्या (सरकार ) तलाव या गटातुन अवैद्य मुरुम उत्खनन व वाहतुक केल्याबाबत चा दाखल प्रकरणात तक्रारादार विरुध्द कायदेशिर दंडात्मक कार्यवाही न करता सदर कार्यावाहीतुन तक्रारदार यांना मुक्त करण्याकरिता तक्रारदारा कडे रु.50,000/- लाच रकमेची मागणी करुन ती लाच रक्कम आरोपी क्र.02 यांचे मार्फतीने पंचा समक्ष स्विकारल्याचे फिर्यादीचे लेखी तक्रारीवरुन सदर चा गुन्हा नोंद करुन तपासात घेतला. दाखल अधिकारी - पो.हवा.कुंडलीक नान्हे ब.नं.1105 पोलीस स्टेशन गोरेगांव तपाशी अधिकारी -शशिकांत पाटील पोलीस निरीक्षक ला.प्र.वि.गोंदिया.फिर्याद , ला . प्र . वि , गोंदिया दिनांक 15.02.2020 नाव : - श्री . काशीनाथ जगन भेंडारकर , वय 41 वर्ष , व्यवसाय - शेती , रा . मु . पो . तेढा , ता . गोरेगांव , जि . गोंदिया . मो . क्र . 8007291862मी दि . 13.2.2020 रोजी पोलीस निरीक्षक श्री शशिकांत श्रीराम पाटील ला . प्र . वि गोंदिया यांचे समक्ष एका लोकसेवकाविरुध्द लाच मागणी संबधाने तक्रार नोंदविली . पोलीस निरीक्षक श्री . पाटील यांनी माझ्या सांगण्याप्रमाणे माझी तक्रार संगणकावर टंकलिखीत करुन त्याची प्रिंट आऊट काढली , त्यावर मी सही केली . मी नोंदविलेली तक्रार खालील प्रमाणे आहे . मी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग , कार्यालय गोंदिया येथे समक्ष येवुन तक्रार नोंदवितो की , मी वरील पत्यावर कुटंबासह राहत असुन शेतीचे काम करतो . मी 2014 मध्ये आयसर कंपनीचा एक ट्रक्टर ज्याचा क्र . एम . एच . 35एजी - 1115असा असुन सदर ट्रक्टरच्या सहाय्याने मी शेतीचे कामे करून घेत असतो . दिनांक 10.02.2020 रोजी मला तहसिलदार , गोरेगांव यांची नोटीस प्राप्त झाली , ज्यामध्ये मौजा हौसीटोला येथील गट क्र . 121आराजी 2.63हे . आर . गुटकाळ्या ( सरकार ) तलाव या

गटातुन अवैध मुरूम उत्खनन व वाहतुक केल्याबाबतचे दाखल प्रकरणात आमचे समक्ष आवश्यक संबंधित कागदपत्रे , पुरावे , व लेखी उत्तरासह दिनांक 12.02.2020 रोजी 11.30 वा . तहसिल कार्यालय , गोरेगांव येथे हजर राहण्याबाबतचा मजकुर नमुद होता . त्याअनुषंगाने मी दिनांक 12.02.2020 रोजी तहसिल कार्यालयात न जाता दि . 13.02.2020 रोजी अंदाजे दुपारी 01.30 वा . दरम्यान तहसिल कार्यालय , गोरेगांव येथे जावून तहसिलदार श्री . शेखर पुनसे यांना भेटलो . त्यावेळी त्यांनी  मला सांगीतले की , आपण हुटकाळ्या ( सरकार ) तलाव या गटातुन अवैध मुरूम उत्खनन व वाहतुक केलेली आहे . त्यामुळे मला तुमच्यावर कायदेशिर कार्यवाही करून तुमच्यावर दंडात्मक कार्यवाही करावी लागेल . जर तुम्हाला कायदेशिर कार्यवाही टाळवयाची असेल तसेच दाखल प्रकरणातुन तुम्हाला मुक्त व्हायचे असेल तर तुम्हाला मला रू . 1,00,000 /-द्यावे लागतील , त्यावर मी त्यांना म्हटले की , मी एवढी मोठी रक्कम देवु शकणार नाही , काही कमी करा साहेब , त्यावर त्यांनी मला रू . 50,000/ - माझे घरी आणुन दे , असे म्हटले . त्यावर मी त्यांना नाईलाजाने ठिक आहे असे बोलून निघून आलो . गै . अ . श्री . शेखर पुनसे , तहसिलदार , तहसिल कार्यालय , गोरेगांव जि . गोंदिया यांनी मौजा हौसीटोला येथील हुटकाळ्या ( सरकार ) तलाव या गटातुन अवैध मुरूम उत्खनन व वाहतुक केल्याबाबतच्या दाखल प्रकरणात माझेविरूष्द कायदेशिर कार्यवाही न करण्याकरीता तसेच सदर प्रकरणातुन मला मुक्त करण्याकरीता माझेकडे मागणी केलेली लाच रक्कम रू 50,000/ - त्यांना देण्याची माझी मुळीच ईच्छा नसल्यामुळे मी त्यांचे विरुध्द कायदेशिर कार्यवाही करण्याकरीता स्वेच्छेने तक्रार देत आहे . त्यांचेशी माझे पुर्वीचे कोणतेही आर्थिक देवाण - घेवाण किंवा पुर्व वैमनस्य नाही . माझी तक्रार मी वाचुन पाहिली , माझे सांगणेप्रमाणे मराठीत संगणकावर बरोबर टंकलिखीत केली आहे .  तदनंतर पो . नि . श्री पाटील यांनी दोन शासकीय पंचांना पाचारण करुन त्यांची ओळख आमच्याशी करुन दिली . पो . नि . श्री पाटील यांनी दोन्ही पंचांना थोडक्यात हकीकत सांगुन माझी तक्रार पंचांना वाचावयास दिली . पो . नि . श्री पाटील यांचे सुचनेवरुन सदरच्या तक्रार अर्जावर दोन्ही पंचांनी स्वाक्षरी केली . त्यानंतर पो . नि . श्री पाटील यांनी स्वाक्षरी केली . त्यानंतर त्यांनी व्हाईस रेकर्डर कशा प्रकारे काम करतो याबाबत आम्हास व पंचास सविस्तर माहीती दिली . तदुनंतर पो . नि . श्री पाटील यांच्या सांगण्यावरुन मी सापळा कार्यवाहीत वापरण्यात येणारी लाच रक्कम रु . 50,000/ त्यांच्याकडे जमा केली . पो . नि . श्री पाटील यांनी लाच रकमेला लावण्यात येणाऱ्या अधासीन पावडरची वैशिष्ट सांगुन त्या नोटांना अंधासीन पावडर लावण्याचे प्रात्यक्षिक आपल्या अधिनस्थ कर्मचारी यांच्या हस्ते करुन दाखविले . त्यानंतर अँधासीन पावडर लावलेल्या रू . 500 / दराच्या 100चलनी नोटा असे एकुण रू . 50,000/ - एका लिफाफ्यात ठेवुन लिफाफा सिलबंद करुन कार्यालयीन कपाटात ठेवुन दिला . पो . नि . श्री पाटील यांनी मला दि . 14.02.2020 रोजी वेळ 8.00वा . दरम्यान गोरेगाव येथील ठाणा रोडवर थांबून राहण्याबाबत सुचना दिल्या . या कार्यवाही बाबतच्या सविस्तर नोंदी सापळा अधिकारी पो . नि . श्री पाटील यांनी पंचनामा क्र . 01 मध्ये घेतल्या आहेत . । दिनांक 14.02.2020 रोजी वेळ08.00 वा . दरम्यान मी पो . नि . श्री पाटील यांचे सुचनेनुसार माझ्याकडे असलेल्या खाजगी मोटार सायकलने गोरेगाव येथील ठाणा रोडवर येवुन थांबलो . त्याठिकाणी पो . नि . श्री पाटील हे दोन्ही पंच व सापळा पथका सोबत हजर होते . त्यानंतर पो . नि . श्री पाटील यांनी पडताळणी कारवाईच्या वेळी घ्यावयाच्या दक्षतेबाबत सुचना दिल्या . वेळ 08.20वा . व्हाईस रेकर्डर सुरु करुन त्यामध्ये पंच क्र . 01 व माझ्या आवाजात पडताळणी करीता जात असल्याबाबतचे संभाषण ध्वनीमुद्रीत करुन व्हाईस रेकर्डरसह मला पंच क्र . 01 यांचेसोबत माझ्याकडे असलेल्या खाजगी मोटार सायकलने गै . अ . श्री . शेखर पुनसे यांचे राहते घरी एकता कलोनी , गोरेगाव येथे जाण्यास रवाना केले . त्यांचे राहते घरी गै . अ . श्री शेखर पुनसे यांचेशी बोलणी दरम्यान त्यांनी मौजा हौसीटोला येथील हुटकाळ्या ( सरकार ) तलाव या गटातुन अवैध मुरूम उत्खनन व वाहतुक केल्याबाबतच्या दाखल प्रकरणात माझेविरूष्द कायदेशिर दंडात्मक कार्यवाही न करता सदर कार्यवाहीतुन मला मुक्त करण्याकरीता माझ्याकडे रू . 50,000 / - लाच रकमेची पंचासमक्ष मागणी करून ती लाच रक्कम प्राप्त करण्याचा प्रयत्न केला . त्यानंतर वेळ 08.56 वा . मी पंच क्र . 1यांच्यासह सापळा पथकाकडे परत आल्यावर व्हाईस रेकार्डर पंच क्र . 1 यांच्या आवाजात बंद करण्यात आला . त्यानंतर पो . नि . श्री पाटील यांनी व्हाईस रेकर्डर मधील रेकर्ड झालेले संभाषण ऐकुण गै . अ . श्री शेखर पुनसे यांनी मौजा हौसीटोला येथील हुटकाळ्या ( सरकार ) तलाव या गटातुन अवैध मुरूम उत्खनन व वाहतुक केल्याबाबतच्या दाखल प्रकरणात माझेविरूध्द कायदेशिर दंडात्मक कार्यवाही न करता सदर कार्यवाहीतुन मला मुक्त करण्याकरीता माझ्याकडे रू . 50,000/ - लाच रकमेची मागणी करुन ती लाच रक्कम प्राप्त करण्याचा प्रयत्न केल्याची खात्री केली . । त्यानंतर पो . नि . श्री पाटील यांचे सांगणेवरून पंच क्र . 01 यांनी माझी अंगझडती घेतली . त्यांनतर पो . नि . श्री पाटील यांनी आपल्या अधिनस्थ कर्मचारी यांच्या हस्ते लाच रक्कम ठेवलेल्या लिफाफ्यातुन अँधासीन पावडर लावलेल्या रू . 500 / - दराच्या 100 चलनी नोटा असे एकुण रू . 50,000/ - पंचासमक्ष काढुन माझ्या फुलप्यांटच्या समोरील उजव्या बाजुच्या खिश्यात ठेवल्या . त्यानंतर पो . नि . पाटील यांनी सापळा कारवाईच्या वेळी घ्यावयाच्या दक्षतेबाबत सुचना दिल्या . त्यानंतर वेळ 10.38 वा . व्हाईस रेकर्डर सुरू करून पंच क्र . 1 व माझ्या आवाजात सापळा कार्यवाहीकरीता जात असल्याचे संभाषण रेकार्ड केले व व्हाईस रेकर्डरसह मला पंच क्र . 1 यांचेसोबत माझ्याकडे असलेल्या खाजगी मोटार सायकलने गै . अ . यांच्या राहते घरी एकता कलोनी , गोरेगाव येथे जाण्यास रवाना केले . त्याठिकाणी गेल्यावर गै .अ . यांचे राहते घराचे दार बंद असल्याने मी पंच क्र . 1 सोबत गै . अ . यांच्या तहसिल कार्यालय , गोरेगाव येथे गेलो . पो . नि . श्री पाटील हे पंच क . 2 व सापळा पथकातील सदस्यांसह आमचे मागो - माग येऊन तहसिल कार्यालय गोरगाव इमारतीच्या आजुबाजुला दबा धरून बसले . मी पंच क्र . 1 यांच्यासह तहसिल कार्यालय गोरेगाव येथे गेलो . त्याठिकाणी गै . अ . श्री शेखर पुनसे यांच्याशी बोलणी दरम्यान त्यांनी मला म्हटले की , आज एस . डी . ओ . साहेबांची मिटींग आहे , हे पैसे तुम्ही आपल्याकडेच ठेवा , तुमचा मोबाईल नंबर देवुन दया , मी तुम्हाला फोन करून नंतर कळवतो , अशा आशयाची बोलणी करून माझ्याकडुन लाच रक्कम स्विकारली नाही . त्यानंतर वेळ 11.11 वा . मी पंच क्र . 1 यांच्यासह ठाणा रोड , गोरेगाव जवळ परत आल्यावर व्हाईस रेकार्डर पंच क्र . 1 यांच्या आवाजात बंद करण्यात आला . त्यानंतर गै . अ . श्री . शेखर पुनसे यांचा मला फोन आल्यानंतर त्यांचेविरूध्द सापळा कार्यवाही करण्याचे ठरविण्यात आले . परंतु गै . अ . यांचा मला फोन आला नाही . त्यामुळे पो . नि . श्री . पाटील यांच्या सुचनेवरून माझे मोबाईल फोनवरून गै . अ . श्री . शेखर पुनसे यांच्या मोबाईलवर संपर्क साधुन बोलणी केली असता गै . अ . यांनी मला  तु आहे गोरेगावात , एक जण आहे बोलतो नंतर , असे बोलुन मी गोरेगावात असल्याची खात्री करून फोन बंद केला . त्यानंतर मी गै . अ . यांचा फोन येण्याची वाट बघितली , परंतु त्यांचा फोन आला नाही , म्हणुन मी गै . अ . यांच्या फोनवर संपर्क साधला असता गै . अ . यांनी माझा फोन उचलला नाही . त्यानंतर पो . नि . श्री . पाटील यांनी माझ्या खिशातील लाच रक्कम रू .50,000 / आपले अधिनस्थ कर्मचाऱ्याचे हस्ते काढुन घेतले . पो . नि . पाटील यांनी गै . अ . श्री . शेखर पुनसे यांच्याविरूध्दची सापळा कार्यवाही दि . 15.02.2020 रोजी करण्याचे ठरवुन मला दि . 15.2.2020 रोजी सकाळी 09.00 वा . गोरेगाव येथील ठाणा रोडवर थांबून राहण्याबाबत सुचनादिल्यात , याबाबतच्या सविस्तर नोंदी पो . नि श्री . पाटील यांनी पंचनामा क्र .  मध्ये घेतल्या आहेत . दिनांक 15.02.2020 रोजी वेळ 09.00 वा . दरम्यान मी पो . नि . श्री पाटील यांचे सुचनेनुसार माझ्याकडे असलेल्या खाजगी मोटार सायकलने गोरेगाव येथील ठाणा रोडवर येवुन थांबलो . त्याठिकाणी पो . नि . श्री पाटील हे दोन्ही पंच व सापळा पथका सोबत हजर होते . यानंतर पो . नि . श्री पाटील यांचे सांगणेवरून पंच क्र . 01 यांनी माझी अंगझडती घेतली . त्यांनतर पो . नि . श्री पाटील यांनी आपल्या अधिनस्थ कर्मचारी यांच्या हस्ते लाच रक्कम ठेवलेल्या लिफाफ्यातुन अँधासीन पावडर लावलेल्या रू . 500 / - दराच्या 100 चलनी नोटा असे एकुण रू . 50,000 / - पंचासमक्ष काढुन माझ्या फुलप्यांटच्या समोरील उजव्या बाजुच्या खिश्यात ठेवल्या .

पोलीस स्टेशन, गोरेगांव जि. गोंदिया



त्यानंतर पो . नि . पाटील यांनी सापळा कारवाईच्या वेळी घ्यावयाच्या दक्षतेबाबत सुचना दिल्या . त्यानंतर वेळ 09.35 वा . व्हाईस रेकर्डर सुरू करून पंच क्र . 01व माझ्या आवाजात सापळा कार्यवाहीकरीता जात असल्याचे संभाषण रेकार्ड केले व व्हाईस रेकॉर्डरसह मला पंच क्र . 01 यांचेसोबत माझ्याकडे असलेल्या खाजगी मोटार सायकलने गै . अ . यांच्या राहते घरी एकता कॉलोनी , गोरेगाव येथे जाण्यास रवाना केले . सापळा पथकातील सदस्य माझे मागो - माग येऊन गै . अ . यांच्या राहते घराच्या आजुबाजुला दबा धरून बसले . मी पंच क्र . 01 यांच्यासह गै . अ . यांच्या घराचे आत गेलो . त्याठिकाणी गै . अ श्री शेखर पुनसे यांचेशी बोलणी दरम्यान त्यांनी मौजा हौसीटोला येथील हुटकाळ्या ( सरकार ) तलाव या गटातुन अवैध मुरूम उत्खनन व वाहतुक केल्याबाबतच्या दाखल प्रकरणात माझेविरूद कायदेशिर दंडात्मक कार्यवाही न करता सदर कार्यवाहीतुन मला मुक्त करण्याकरीता माझ्याकडे रु .50,000 / - लाच रकमेची मागणी करून ती लाच रक्कम तिथे हजर असलेले त्यांचे घरमालक श्री . शाहीदलतीफ पठाण ( खाजगी इसम ) यांच्याकडे देण्यास सांगितली . त्यावरून मी माझे फुलपॅन्टचे समोरील उजव्या खिश्यात ठेवलेली लाच रक्कम रु . 50,000/ - माझ्या उजव्या हाताने काढुन गै अ श्री शेखर पुनसे यांचे घरमालक श्री . शाहीद लतीफ पठाण ( खाजगी इसम ) यांना पंचासमक्ष दिली . श्री . शाहीद लतीफ पठाण ( खाजगी इसम ) यांनी ती लाच रक्कम रू . 50,000 / - आपले उजव्या हाताने स्विकारून हॉलमध्ये असलेल्या समोरील बेडवर ठेवली . त्यानंतर मी त्यांचे घराच्या बाहेर दर्शनी ठिकाणी येवुन सापळा पथकास गै . अ . श्री शेखर पुनसे यांनी श्री . शाहीद लतीफ पठाण ( खाजगी इसम ) यांचे मार्फतीने लाच रक्कम स्विकारल्याचा नियोजीत इशारा केला . त्यावेळी सापळा पथकाने आरोपी क्र . 1 ) श्री . शेखर शेषराव पुनसे , वय 48 वर्ष , तहसिलदार , तहसिल कार्यालय , गोरेगांव जि . गोंदिया , रा . 98 जुना सुभेदार ले - आऊट , नागपूर - 24 , ह . मु . व्दारा - श्री . शाहीद लतीफ पठाण , रा . एकता कॉलोनी , वार्ड नं . 10 , गोरेगांव ता . गोरेगांव , जि . गोंदिया व आरोपी क्र . 2 ) श्री . शाहीद लतीफ पठाण , वय 34 वर्ष , व्यवसाय ट्रक चालक , रा . एकता कॉलोनी , वार्ड नं . 10, गोरेगांव ता . गोरेगांव , जि . गोंदिया , ( खाजगी इसम ) यांना रंगेहात पकडले . त्यानंतर वेळ 09.49 वा पंच क्र . 01 च्या आवाजात व्हाईस रेकार्डर बंद करुन पुढील कार्यवाही करण्यात आली . याबाबतच्या सविस्तर नोंदी पो . नि . श्री . शशिकांत पाटील यांनी पंचनामा क्र .03 मध्ये घेतल्या आहेत . तरी आरोपी लोकसेवक श्री . शेखर शेषराव पुनसे , वय 48 वर्ष , तहसिलदार , तहसिल कार्यालय , गोरेगांव जि . गोंदिया , रा . 98 जुना सुभेदार ले - आऊट , नागपूर - 24 , ह . मु . व्दारा - श्री . शाहीद लतीफ पठाण , रा . एकता कॉलोनी , वार्ड नं . 10 , गोरेगांव ता . गोरेगांव , जि . गोंदिया ( वर्ग - 1 ) यांनी आपल्या लोकसेवक पदाचा दुरूपयोग करूनमौजा हौसीटोला येथील हुटकाळ्या ( सरकार ) तलाव या गटातुन अवैध मुरूम उत्खनन व वाहतुक केल्याबाबतच्या दाखल प्रकरणात माझेविरूष्द कायदेशिर दंडात्मक कार्यवाही न करता सदर कार्यवाहीतुन मला मुक्त करण्याकरीता माझ्याकडे रु . 50,000 / - लाच रकमेची मागणी करुन ती लाच रक्कम आरोपी क्र . 2) श्री . शाहीद लतीफ पठाण , वय 34 वर्ष , व्यवसाय ट्रक चालक , रा .एकता कॉलोनी , वार्ड नं . 10 , गोरेगांव , ता . गोरेगांव , जि . गोंदिया , ( खाजगी इसम ) यांच्या मार्फतीने पंचासमक्ष स्विकारली . म्हणुन माझी त्यांचेविरुध्द कायदेशिर फिर्याद आहे . माझी वरील फिर्याद मराठीत टंकलिखीत केली असुन ती मला वाचुन दाखविण्यात आली . ती माझ्या सांगण्याप्रमाणे बरोबर व खरी आहे .

**13.Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at** **(**केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.**)**

**(1) Registered the case and took up the investigation:** **(**प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले**):** SURESH RAMKRUSHNA NARNAVARE(Inspector)) / POBN43743 **or (**किंवा**)**

**(2) Directed (Name of I.O.) (**तपास अधिका-याचे नाव**):**

**Rank (**पद**):**

**No.(**क्र.**):** **to take up the Investigation (**ला तपास करण्याचे अधिकार दिले**) or (**किंवा**)**

**(3) Refused investigation due to (**ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला**):**

**or (**ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला**)**

**(4) Transferred to P.S.(**गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव**):**

**District (**जिल्हा**):**

**on point of jurisdiction (**को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित**) .**

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (**प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.**)**

**R.O.A.C.(**आर. ओ .ए .सी.**)**

पोलीस स्टेशन, गोरेगांव
जि. गोंदिया

**14. Signature/Thumb impression of the complainant / informant.** (तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

दि. 15/02/2020

**15. Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची

**Name** (नाव): SURESH RAMKRUSHNA

**Rank**(पद): I (Inspector)

**No.**(सं.): POBN43743

पोलीस ठाणे अमलदार
पो.स्टे.गोरेगाव
जि.गोंदिया

**Attachment to item 7 of First Information Report (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र):**
**Physical features, deformities and other details of the suspect/accused: ( If known / (संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्टये, व्यंग आणि इतर तपशील))**

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म | Build (बांधा) | Height (cms.) (उंची | Complexion (रंग) | Identification Mark(s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |
| 2 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा/बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
**(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)**